# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:9001:2000)

**शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला,**

**४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.**

**दूरध्वनी क्र.** (०२२) २६४७१२५५(का.)/३२५०८७०६ (वै.) **फॅक्स क्र.** (०२२) २६४७३९८०

Email : secretary@msbte.com Web : www.msbte.com


**जा.क्र.मरातंशिमं/का - ५०/कला परिपत्रक/२००८/११९३४** **दिनांक – ०५/११/२००८**

**तात्काळ : वेब परिपत्रक**

**विषय : कला पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांनी दि.१०/११/२००८पर्यंत संलग्न होण्याबाबत**

**संदर्भ : परिपत्रक क्र.मरातंशिमं/का-५३/ कलाशिक्षण/२००८/४९५६, दि.२१ मे २००८**

राज्यातील कला पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व शासनमान्य संस्थांना कळविण्यात येते की शासनाने कला संचालनालयाच्या अधिपत्त्याखालील ११ कला अभ्यासक्रम मंडळाकडे हस्तांतरीत केलेले आहेत. त्याअनुषंगाने कला पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व शासनमान्य संस्थांनी मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडे दि.३१ ऑगस्ट २००८ पर्यंत आवश्यक संलग्नता शुल्क आणि विहित नमुन्यात संस्थेची माहिती भरुन संलग्नता प्राप्त करुन घेण्याबाबत संदर्भांकीत परिपत्रकान्वये सर्व कला संस्थांना सूचित करण्यात आलेले आहे. **सदर मुदत दि.१०/११/२००८ पर्यंत वाढविण्यात येत असून मंडळाशी संलग्न न झालेल्या संस्थांनी संदर्भाधीन परिपत्रकानुसार संलग्नतेबाबतची कार्यवाही करण्यात यावी.** (संदर्भाधीन परिपत्रक मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.)

तरी ज्या कला संस्था अद्यापपर्यंत मंडळाशी संलग्न झालेल्या नाहीत, अशा संस्थांनी **दि.१०/११/२००८** पर्यंत मंडळाच्या विभागीय कार्यालयाशी संपर्क साधून संलग्नता प्राप्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही करावी.

**( प्र. अं. नाईक )**
सचिव,
म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-५१

प्रत :

१) मा.संचालक, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर
२) मा. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई. त्यांना विनंती करण्यात येते की, मंडळाशी संलग्न न झालेल्या संस्थांना संलग्न होण्याबाबत त्वरीत कळविण्यात यावे.
३) उपसचिव, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ विभागीय कार्यालय पुणे/औरंगाबाद/नागपूर आणि मुंबई उपविभाग यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना. त्यांना निर्देशित करण्यात येते की, विभागातील कला अभ्यासक्रम चालविणाऱ्या ज्या संस्था अद्यापपर्यंत संलग्न झालेल्या नसतील त्यांना तात्काळ मंडळाच्या विभागीय कार्यालयाशी संपर्क साधून **दि.१०/११/२००८ पर्यंत संलग्नता** शुल्क भरुन संलग्न होण्याबाबत सूचित करण्यात यावे.
४) प्राचार्य, राज्यातील कला पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व शासनमान्य संस्था.
५) Web Portal Incharge, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई